


माणदेशाच्या विकासावर दृष्टिक्षेप टाकणारे पुरोगामी विचारसरणीचे एकमेव दैनिक

# माणदूत एक्सप्रेस

स्थापना २००२

www.mandootexpress.com

email- mandootexpress5@gmail.com

संपादक–मोहन मस्के मो.९८५०४०३७७३

■ सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा, माळशिरस, आटपाडी, जत, सोलापूर, सांगली ■




वर्ष–२४ वे | अंक –१७४ | पृष्ठे–४ | मूल्य – १ रुपये | सोमवार दि.१३ एप्रिल २०२६ | R.N.I. NO. MAHMAR/2002/10619




## उत्कर्ष विद्यालयाचे डॉ होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत उत्तुंग यश





सांगोला (प्रतिनिधी):- शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या उत्कर्ष विद्यालयाने यंदाही आपली यशाची परंपरा कायम राखली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत विद्यालयातील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

इयत्ता सहावीतील कु. मनस्वी मंगेश कुलकर्णी हिने या स्पर्धेत सिल्वर मेडल पटकावून विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले, तर कु. श्रेया दत्तात्रय जाधव हिने ब्राँझ मेडल मिळवून यशाची पताका फडकावली. त्यांच्या या यशामुळे विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या यशस्वी विद्यार्थिनींना विभागप्रमुख प्रशांत भोसले सर, श्री. संचित राऊत सर, प्रयोगशाळा सहाय्यक महेश फुले सर, शेख मॅडम, सावंत सर तसेच मुख्याध्यापक श्री. सुनील कुलकर्णी सर यांचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष डॉ. संजीवनी केळकर, अध्यक्ष नीलिमा कुलकर्णी, सचिव वसुंधरा कुलकर्णी, सर्व संस्था पदाधिकारी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांचेकडून तसेच पालक वर्गातून विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

## ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे निधन

मुंबई:- ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच निधन झालं आहे. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांनी ब्रीच कँडी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला आहे. आतापर्यंतची सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. गायिका आशा भोसले यांना हृदयविकाराचा झटका आला होता. फुफ्फुसांच्या त्रासामुळे त्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळाली होती. त्यांना शनिवारी संध्याकाळी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. वृत्तसंस्था पीटीआयने सूत्रांच्या हवाल्याने ही माहिती देण्यात आली होती. अखेर रविवारी १२ एप्रिल २०२६ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. १३ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता अंत्यसंस्कार होणार आहेत.

### ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळवणाऱ्या पहिल्या भारतीय गायिका

**आशा भोसले या ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळवणाऱ्या पहिल्या भारतीय गायिका होत्या. त्यांना पद्मभूषण पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले होते. या गायिकेने २० हून अधिक भाषांमध्ये गायन केले.**

आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ साली झाला. या भारतीय चित्रपटसृष्टीतील एक दिग्गज पार्श्वगायिका म्हणून त्या लोकप्रिय होत्या. ज्यांची कारकीर्द सात दशकांहून अधिक काळ चालली आहे. त्यांनी २० हून अधिक भाषांमध्ये १२,००० हून अधिक गाणी गायली असून, त्यांच्या अष्टपैलू गायनासाठी (रोमँटिक ते गझल, कॅबरे ते शास्त्रीय) त्या प्रसिद्ध आहेत. आशा भोसले यांना पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

आशा भोसले यांच्या कारकीर्दीतील प्रमुख वैशिष्ट्ये

८ दशकांपेक्षा जास्त काळ चाललेल्या कारकीर्दीत त्यांनी हिंदी, मराठी, बंगाली, गुजराती, पंजाबी अशा अनेक भाषांमध्ये हजारो गाणी रेकॉर्ड केली आहेत. तसेच आशाजींनी बॉलिवूडमधील 'दम मारो दम', 'पिया तू अब तो आजा', 'चुरा लिया है तुमने' यांसारख्या



आयकॉनिक गाण्यांपासून ते गझल, भजन, आणि भावगीतांपर्यंत सर्व प्रकारच्या गाण्यांमध्ये आपला ठसा उमटवला आहे. आशा भोसले यांच्या नावे जागतिक विक्रम नोंदवण्यात आले आहेत. २०११ मध्ये, 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'ने त्यांना संगीताच्या इतिहासातील सर्वात जास्त गाणी रेकॉर्ड करणारी कलाकार म्हणून मान्यता दिली.

## फुलेनगर येथील भारत राऊत यांचे निधन



सांगोला (प्रतिनिधी):- सांगोला शहरातील फुलेनगर येथील भारत नारायण राऊत यांचे शनिवार दि.११ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ६० होते.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी, सुन,जावई, २ भाऊ असा परिवार आहे.

भारत राऊत हे सहकार क्षेत्रात ऑडिटर म्हणून जबाबदारीने कार्यरत होते. तसेच रामानंद संप्रदाय मध्ये त्यांनी स्वतःला समर्पित करून सांगोला तालुका व सोलापूर जिल्ह्यात विविध सेवा कार्यांत सक्रिय सहभाग नोंदवला होता. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेने त्यांनी स्वतःचे मरणोपरांत नेत्रदान करून अंधांना दृष्टी देण्याचे पुण्य कार्य करून अवयव दानाचा पाया रोवला आहे.

त्यांचा तिसऱ्या दिवसाचा विधी सोमवार दि.१३ एप्रिल रोजी सकाळी ७.३० वाजता वाढेगाव नाका स्मशानभूमी, सांगोला येथे होणार आहे.

## माण व कोरडा नदीवरील १८ बंधाऱ्यांतील पाणी पूर्णतः संपुष्टात; शेतकरी हवालदिल

सांगोला (प्रतिनिधी): उन्हाळ्याच्या तीव्र झळांनी सांगोला तालुक्यातील जलस्रोत अक्षरशः कोरडे पडले असून माण व कोरडा नदीवरील एकूण १८ बंधाऱ्यांतील पाणी पूर्णतः संपुष्टात आले आहे. परिणामी शेतकऱ्यांवर पाणी टंचाई चे संकट कोसळले असून टेंभू उपसा सिंचन योजनेच्या पाण्याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहेत. मात्र प्रशासनाकडून अद्याप ठोस नियोजन नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. पिके व फळबागा वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे.

माण नदीवरील खवासपूर, लोटेवाडी, बलवडी, नाझरे, अनकढाळ, चिणके, वाटंबरे, वासूद, कडलास, सांगोला, वाढेगाव, मांजरी, बामणी, सावे, मेथवडे आणि पंढरपूर तालुक्यातील शेटफळ या १७ बंधाऱ्यांसह कोरडा नदीवरील आलेगाव व मेडशिंगी असे एकूण १८ बंधारे कोरडे पडले आहेत. दरवर्षी पावसाळ्यात साठवले जाणारे पाणी १५ ऑक्टोबरपर्यंत बंधाऱ्यांमध्ये अडवले जाते, तर ३१ मेनंतर दारे काढली जातात. या पाण्यावर माण नदीकाठावरील सुमारे १२ हजार ८९२ हेक्टर आणि कोरडा नदीवरील ६४० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली

**सांगोला माण नदीवरील १७ बंधारे व कोरडा नदीवरील २ बंधारे तसेच अचकदाणी, हंगिरगे, जवळा, घेरडी व चिंचोली तलावाच्या लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांकडील सुमारे २८ लाख रुपये थकबाकीपैकी १२ लाख रुपये वसूली झाली आहे तर उर्वरित थकबाकीची वसुली सुरू असल्याचे शाखा अभियंता व्यंकटेश सणगनकर यांनी सांगितले.**

येते. मात्र यंदा उन्हाळ्याच्या प्रारंभीच पाणी आटल्याने हजारो हेक्टर शेती धोक्यात आली आहे.

दरवर्षी टेंभू व म्हैसाळ योजनांमधून उन्हाळ्यात पाणी सोडून हे बंधारे भरले जातात. मात्र यंदा पाणीपट्टीच्या थकबाकीचा मुद्दा आड येत असल्याने पाणीपुरवठा रखडल्याचे स्पष्ट होत आहे. परिणामी शेतकऱ्यांना पिके वाचवण्यासाठी विहिरी, बोअरवेल आणि टँकरच्या भरवशावर जगण्याची वेळ आली आहे. सद्यस्थितीत जवळा, चिंचोली व घेरडी तलावात काही प्रमाणात पाणी असले तरी अचकदानी व हंगिरगे तलाव पूर्णतः कोरडे पडले आहेत. त्यामुळे केवळ शेतीच नव्हे, तर नागरिक आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

## माळवाडी येथील दादासो माळी यांचे निधन



सांगोला (प्रतिनिधी):- सांगोला शहरातील माळवाडी येथील रहिवाशी श्री.दादासो बापू माळी यांचे शनिवार दि.११ एप्रिल २०२६ रोजी दुःखद निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ७६ होते.

सांगोला येथील प्रा.चांगदेव माळी यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.

त्यांचा तिसरा दिवस विधी कार्यक्रम आज सोमवार दि.१३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७:०० वाजता वाढेगाव नाका स्मशानभूमी, सांगोला येथे होणार असल्याचे त्यांच्या नातेवाईकांनी सांगितले.



राज्यस्तरीय आदर्श समाज रत्न पुरस्कार प्राप्त श्री रामराव घाडगे सरकार यांचा सत्कार श्री.मोहन रंगराव माने (अध्यक्ष रंगराव माने चॅरीटेबल ट्रस्ट शिरोळ जि कोल्हापूर) यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

## शहाजीबापूंची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना व्यासपीठावरच साद

### तानाजी सावंत यांना सोलापूरमध्ये लक्ष घालायला सांगा; शिवसेनेचे ५-६ आमदार निवडून येतील



पंढरपूर (प्रतिनिधी):- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आमची एकच विनंती आहे, तानाजी सावंत यांनी २०१८-२०१९ मध्ये ज्या प्रमाणे सोलापूरमध्ये लक्ष घातले, तसे पुन्हा एकदा त्यांना सोलापूरमध्ये लक्ष घालायला सांगा. शिवसेनेचे पाच ते सहा आमदार निवडून आले, असे आजच जाहीर करतो, अशा शब्दांत माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंतांना सोलापूरच्या राजकारणात लक्ष घालण्याची विनंती केली.

पंढरपूरच्या नगराध्यक्षा प्रणिता भालके, भगीरथ भालके आणि अनिल सावंत यांच्या शिवसेना प्रवेशाच्या कार्यक्रमात बोलताना शहाजीबापू पाटील यांनी तानाजी सावंत यांना सोलापूरकडे लक्ष देण्याची विनंती केले.

ते म्हणाले, तानाजी सावंत तुम्ही जे धाराशिवला जाऊन बसलात ते आम्हाला सापडेनातसुद्धा झाला आहात. या जरा सोलापूरला, तुमचं हे घर (सोलापूर) आहे. तिकडं सासरवाडी (धाराशिव) आहे, माहेर (सोलापूर) इकडं आहे. आई-बापाचं प्रेम इथं आहे.

राजकीय जीवनात मला एकनाथ शिंदे यांच्या रुपाने एकमेव आधार मिळाला आहे. भगीरथ भालके यांचा शिवसेनेत प्रवेश व्हावा, यासाठी आम्ही गेली दोनेक वर्षे प्रयत्न करत होतो. मात्र, आपल्याच काही लोकांनी वावड्या उठवून भालकेंचा प्रवेश रोखण्याचे काम केले, असा गौप्यस्फोटही पाटील यांनी केला.

ते म्हणाले, भगीरथ भालके आणि अनिल सावंत यांना एवढंच सांगतो की, दोन वर्षांत एकट्या सांगोला तालुक्याला साडेपाच हजार कोटी रुपये मिळत असतील, तर पंढरपूरला काय मिळेल, याचा विचारसुद्धा तुम्ही करू शकणार नाही. एकनाथ शिंदे यांनी निधीसाठी आलेल्या कागदावर न वाचता सह्या केल्या आहेत. तळागाळ्यातील लोकांसाठी ते रात्रंदिवस कष्ट करणारे नेतृत्व म्हणून एकनाथ शिंदे यांच्याकडे पाहिले जाते.

आम्ही गुवाहाटीला गेलो म्हणून आज आमच्या बहिणींना महिन्याला १५०० रुपये मिळत आहेत. ज्योती वाघमारे यांना राज्यसभा सदस्य करण्याचा निर्णय तुमचा सर्वांत मोठा राजकीय निर्णय आहे, असे मी मानतो. भालके आणि सावंत यांचा शिवसेना प्रवेश सोलापूरच्या राजकीय जीवनाला कलाटणी देणारा ठरेल. सोलापूरमध्ये १९९५ मध्ये शिवसेनेचे जे वैभव होतं, ते पुन्हा आपल्याला दिसून येईल, असा विश्वास शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केला.

माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी 'पंढरपूरचा गुलाल ज्यांचा हाती आहे,' असे अनिल सावंत असा उल्लेख केला. याचवेळी बोलताना शहाजीबापूंनी पंढरपूरच्या नगराध्यक्षा प्रणिता भालके असा उल्लेख करण्याऐवजी आमची कन्या प्रणितीताई शिंदे असा नामोल्लेख केला. त्यामुळे व्यासपीठावर चांगलीच खसखस पिकली होती.



## शेवटच्या श्वासातही मंत्रमुग्धता...

भारतीय रसिकांच्या मनावर आठ दशके सुमधूर,मधाळ आवाजातून हुकूमत गाजवलेल्या गानकोकिळा तथा प्रख्यात पार्श्वगायिका आशा भोसले यांना नियतीने आपल्यातून हिरावून नेले.शनिवारी प्रकृती अस्वाथ्यामुळे त्यांना मुंबईच्या ब्रीच कॅन्डी हॉस्पिटलमध्ये त्यांना दाखल करण्यात आले होते.त्यांच्यासाठी देशभर प्रार्थना होत होती परंतु काळापुढे आपल्याला हार पत्करावी लागली आणि आशाताई आपल्यातून निघून गेल्या.लता,आशा,हृदयनाथ,उषा आणि मीना ही पाच भावंडे.लता आणि आशा निवर्तल्या. शास्त्रीय संगीतातील थोर उपासक मास्टर दीनानाथ मंगेशकर यांची ही पिढी.तरूणपणात पाय ठेवण्यापूर्वीच वडिलांचे छत्र हरपल्यानंतर लतादीदींनी साऱ्या भावडांची जबाबदारी पत्करली.घरात एक तानपुरा होता.वडिलांचा आदर्श घेवून या भावंडांनी संगीताची उपासना पुढे सुरू ठेवली.संगीतावरची निष्ठा आणि साधना यामुळे या संगीताने मंगेशकर फॅमिलीला किर्ती आणि संपत्ती मिळवून दिली.त्यापैकीच एक आशाताई होत.त्यांच्या जाण्याने संगीत क्षेत्रातील एक युग संपल्याची खंत देशभर व्यक्त होते आहे. आठ दशकांपासूनचा चिरतरुण आवाज काळाच्या पडद्याआड गेला आहे. आशाताईंचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगलीत झाला.त्यांचा सांगितिक प्रवास विलक्षण ठरला असलातरी वैयक्तिक आयुष्य मात्र खडतरच गेले. आशा ताईंचे वैयक्तिक आयुष्य अनेक चढ-उतारांनी भरलेले होते. प्रसिद्ध संगीतकार आर डी बर्मन म्हणजे राहुल देव बर्मन व आशा भोसले या दोघांची जोडी संगीत क्षेत्रात अत्यंत यशस्वी ठरली. १९९४ मध्ये आर. डी. बर्मन यांच्या निधनापर्यंत ते एकत्र होते. आशा ताईंनी वयाच्या १० व्या वर्षी, १९४३ मध्ये 'माझा बाळ' या मराठी चित्रपटासाठी 'चला चला नव बाळ' हे पहिले गाणे गायले होते. १९४८ मध्ये 'चुनरिया' या चित्रपटातील 'सावन आया' या गाण्याद्वारे त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले होते. सुरुवातीच्या काळात त्यांना मुख्यत्वे ज्या गाण्यांना इतर गायिका नकार द्यायच्या, अशी गाणी मिळत असत. संगीतकार ओ. पी. नय्यर यांनी आशाताईंच्या आवाजातील वेगळेपण ओळखले. 'नया दौर' (१९५७) सारख्या चित्रपटांमुळे त्या खऱ्या अर्थाने प्रकाशझोतात आल्या. १९७० च्या दशकात आर. डी. बर्मन यांच्यासोबत त्यांनी 'दम मारो दम', 'पिया तू अब तो आजा' आणि 'चुरा लिया है' सारखी एकापेक्षा एक सुपरहिट गाणी दिली. मराठी आणि हिंदीसह २० हून अधिक भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये गाणी गायली आहेत. त्यांनी १२ हजारां हून अधिक गाणी रेकॉर्ड केली असून, त्यांच्या नावावर सर्वाधिक स्टुडिओ रेकॉर्डिंगचा 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' देखील नोंदवला गेला होता. आपल्या चिरतरुण आवाजाने सगळ्या जगाला त्यांनी भुरळ घातली. आज संपूर्ण देश आणि महाराष्ट्र आकंठपणे दुःखात बुडाला आहे. एका स्वर युगाचा अंत झाला आहे. आशाताईंचे असणे हे वर्षानुवर्षे समाधानाची अनुभूती देत होते. आपण दुःखाला कवटाळून लोकांना आनंद देणं ही त्यांची खासियत होती. त्यांचे कर्तत्व जगाला वेड लावणारे होते. अशा आशाताई आज आपल्यात राहिल्या नाहीत. आपल्या वेगळ्या आवाजाची भुरळ सगळ्या जगाला पडली होती. त्या जरी आपल्याला सोडून गेल्या असल्या तरीही त्यांचे गाणे कायमच आपल्या सोबत राहणार आहे. तो आवाज कायमच आपल्याला साथ देईल यात शंका नाही.पद्मविभूषण ते महाराष्ट्र भूषण अशा कितीतरी सन्मानाने आशाताईंचा गौरव झाला आहे. त्यांच्या कर्तृत्वाच्या जोरावर आशाताईंचा राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरव करण्यात आला आहे. महाराष्ट्र सरकारनेही त्यांना महाराष्ट्र भूषण पूरस्कार देऊन गौरविले आहे. सन १९९६ साली गाजलेल्या जॅकी श्रॉफ आणि उर्मिला मांतोडकर यांच्या ''रंगीला'' या सिनेमासाठी फिल्मफेयर स्पेशल अवॉर्डने त्यांचा सन्मान करण्यात आला होता. चित्रपट क्षेत्रातील सर्वात मानाचा समजला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कारही आशाताईंना प्रदान करण्यात आला होता. बॉलिवूडची गायिका म्हणून त्या प्रसिद्ध होत्या. आशाताईंनी अनेक सुपरहिट गाण्यांना आवाज दिलाय. अगदी गझल, अभंग, भूपाळीपासून थेट तरुणांच्या मनाला भिडणारी दम मारो दम, ओम शांती ओम यांसारख्या गाण्यांपर्यंत आशाताईंनी अनेक गाणी गायलीत. त्यांनी तब्बल सहा दशकं इंडस्ट्रीसाठी नवनवीन गाणी गायली, एवढेच नाहीतर त्यांनी गाणी गाताना अनेक नवनवे प्रयोगही केलेत. पण, एका पॉडकास्टमध्ये बोलताना त्यांनी आपली शेवटची इच्छा व्यक्त केली होती. आशाताई, अमृता राव आणि आरजे अनमोल यांच्या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. या दरम्यान, या दिग्गज गायिकेने आपली अखेरची इच्छा व्यक्त केली होती. या इच्छेवरून हे अगदी स्पष्ट होतं की, आपल्या कलेवर, म्हणजेच गायनावर, त्यांचे नितांत प्रेम आहे आणि याच कलेत मग्न असतानाच आपला अखेरचा प्रवास सुरू करावा, अशी त्यांची मनोमन इच्छा होती. अमृता रावच्या पॉडकास्टमध्ये बोलताना त्या म्हणाल्या होत्या की, ''माझे देवाकडे एकच मागणे आहे, मी गात असतानाच, मला मरण यावे... बास्स... हीच माझी मनापासून इच्छा आहे. आता माझ्यासाठी शिकण्यासारखे काहीच उरलेले नाही. आता आणखी काय शिकायचे बाकी आहे? गाणे हेच माझे आयुष्य आहे. मी अगदी बालपणापासून गात आलेय, विशेषतः वयाच्या तिसऱ्या वर्षापासूनच मी माझ्या वडिलांकडे शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेण्यास सुरुवात होती. माझे संपूर्ण आयुष्य मी याच कलेला समर्पित केले आहे. मी सिनेसृष्टीत ८० ते ८२ वर्ष व्यतीत केली आहेत आणि आता, माझी अंतिम इच्छा केवळ हीच आहे की, मी या जगाचा निरोप घ्यावा. जर गात असतानाच मी या जगातून एक्झिट घेतली, तर त्यामुळे मला सर्वाधिक आनंद होईल.त्यांच्या या भावना किती ओतप्रोत आहेत हे लक्षात येते.भावस्पर्शी,ठसकेबाज आणि ढंगदार शैलीतील त्यांची गाणी सूर्य-चंद्र असे पर्यंत रसिकांच्या कानात रूंजी घालत राहतील.त्यांचा हाच ठेवा आशाताई असतील.शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी गायकी जोपासली.शेवटच्या श्वासातही गायकीची मंत्रमुग्धता होती. त्यांच्या सांगितिक जीवनाला आमचा त्रिवार सलाम.

माणदूत एक्सप्रेस हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक मोहन शंकर मस्के यांनी भास्कर प्रिटींग प्रेस प्रा.लि. रामदेव वेअर हाऊस, हैद्राबाद रोड, सोलापूर (महाराष्ट्र) येथे छापून १०३२/२ ब लोहार गल्ली, सांगोला ता.सांगोला जि.सोलापूर पि.नं.४१३३०७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशीत केले.

माणदूत एक्सप्रेस

EMail: mandootexpress5@gmail.com

दै.माणदूत एक्सप्रेसमधील प्रसिध्द होणाऱ्या बातम्या, जाहीराती व लेखातील मजकूरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# उन्हाळ्यात पुदिना खाण्याचे आरोग्यदायी फायदे.

कडक उन्हात आणि कडक उन्हात थंडपणाची भावना देण्यासाठी पेपरमिंट हा सर्वात चांगला आणि सोपा नैसर्गिक उपाय आहे. हिरव्या आणि सुगंधी पुदीन्याच्या लहान पानांमुळे केवळ ताजेतवाने सुगंध येत नाही तर शरीर आणि मन दोन्हींना थंडावा मिळतो. उन्हाळ्यात पुदीन्याचे सेवन अनेक आजारांपासून वाचण्यातही खूप परिणामकारक ठरते . पुदीना पोषक तत्वांनी समृद्ध असतो. ह्यामध्ये असलेले मेन्थॉल शरीराला नैसर्गिक शीतलता देते . उन्हाळ्यात पुदिन्याची चटणी, रायता, रस, पन्ना, कोशिंबीर किंवा पाण्यात मिसळून प्यायल्याने उष्णतेचा प्रभाव लक्षणीयरीत्या कमी होतो. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, उन्हाळ्यात शरीराचे तापमान नियंत्रणात ठेवण्यासाठी पुदीना हा सर्वात सोपा मार्ग आहे.

आयुर्वेदात पुदिनाचे विशेष स्थान आहे आणि त्याच्या सेवनाने शरीराला अनेक फायदे होतात. तज्ञ आपल्या आहारात दररोज दही रायता, पुदिन्याची चटणी, लिंबू-पुदिन्याचे पाणी किंवा कोशिंबीर या स्वरूपात याचा समावेश करण्याचा सल्ला देतात. आयुर्वेदानुसार पुदिना हे एक अत्यंत गुणकारी आणि शीतल औषधी वनस्पती मानले जाते. त्याचा स्वभाव थंड असल्यामुळे तो पित्त दोष शांत करण्यास मदत करतो. पुदिन्याचा वापर प्रामुख्याने पचन सुधारण्यासाठी केला जातो. त्यातील नैसर्गिक घटक अन्नाचे पचन सुलभ करतात, वायू, अपचन आणि पोटदुखी कमी करतात.

जेवणानंतर पुदिन्याचे सेवन केल्यास पोट हलके राहते आणि अन्न नीट पचते. तसेच, पुदिन्याचा रस किंवा चहा घेतल्याने मळमळ, उलटी आणि ॲसिडिटी कमी होण्यास मदत होते. पुदिना श्वसनाच्या समस्यांसाठीही उपयुक्त मानला जातो. सर्दी, खोकला किंवा घशातील त्रास असल्यास पुदिन्याचे सेवन आराम देते. त्यातील मेंथॉल हा घटक श्वसनमार्ग मोकळा करतो आणि श्वास घेणे सोपे करतो. आयुर्वेदात पुदिन्याचा वापर डोकेदुखी कमी करण्यासाठीही केला जातो. पुदिन्याच्या तेलाचा वास घेतल्यास किंवा कपाळावर लावल्यास थंडावा मिळतो आणि ताण कमी होतो. याशिवाय, पुदिना त्वचेसाठीही फायदेशीर आहे. तो त्वचेवरील सूज, खाज आणि मुरूम कमी करण्यास मदत करतो. आयुर्वेदिक दृष्टिकोनातून पुदिना शरीराला ताजेतवाने ठेवतो आणि मनाला शांत करतो. तो शरीरातील उष्णता कमी करून संतुलन राखण्यास मदत करतो. मात्र, पुदिन्याचे सेवन मर्यादित प्रमाणात करणे आवश्यक आहे, कारण जास्त प्रमाणात घेतल्यास काही वेळा ॲसिडिटी किंवा पोटात जळजळ होऊ शकते. एकूणच, पुदिना हा एक नैसर्गिक आणि सुरक्षित उपाय आहे, जो योग्य प्रमाणात वापरल्यास शरीराचे आरोग्य सुधारण्यास मदत करतो.

**पुदिन्याचे सेवन करण्याचे फायदे पचन –** पेपरमिंट पचनसंस्था मजबूत करते. यामुळे अपचन, गॅस, आम्लपित्त आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्या दूर होतात, पोट हलके राहते आणि भूक वाढण्यास मदत होते.

**पाण्याची कमतरता –** डिहायड्रेशन रोखण्यासाठी पेपरमिंट देखील प्रभावी आहे. उन्हाळ्यात जास्त घाम आल्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होते. पुदिन्याचे पाणी पिण्यामुळे डिहायड्रेशनची समस्या उद्भवत नाही आणि दिवसभर ताजेपणा राहतो.

**डोकेदुखी –** डोकेदुखी आणि तणाव कमी करते, डोकेदुखी आणि मानसिक तणाव दूर करण्यासाठी पुदीनाचा चहा खूप फायदेशीर आहे.

**ऊर्जा –** सकाळी रिकाम्या पोटी पुदिन्याचे पाणी पिल्याने दिवसभर ऊर्जा आणि ताजेपणा राहतो.

**प्रतिकारशक्ती –** पेपरमिंटमध्ये अँटीऑक्सिडंट्स समृद्ध असतात. हे शरीराची प्रतिकारशक्ती मजबूत करते आणि हंगामी आजारांपासून संरक्षण करण्यास मदत करते.

**घामाचा वास –** पुदिन्याचे सेवन केल्याने घामाचा वास कमी होतो किंवा नाहीसा होतो .

**लठ्ठपणा –** पुदिना लठ्ठपणा कमी करण्यात



साहाय्यक आहे . जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर तुम्ही त्याचे सेवन करू शकता.

**सूज –** पेपरमिंटमध्ये अँटीमाइक्रोबियल गुणधर्म असतात आणि जळजळ कमी होते. हे शरीराची जळजळ देखील कमी करू शकते.

**उन्हाळ्यात पुदिना खाण्याचे आरोग्यदायी फायदे.**

आयुर्वेदात पुदीना उन्हाळ्यासाठी विशेष उपयुक्त मानला गेला आहे. यूएस नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या अभ्यासानुसार पुदीनाचे अनेक आरोग्य फायदे देखील नोंदवले गेले आहेत, ज्यात दाहक-विरोधी आणि अँटिऑक्सिडेंट गुणधर्मांचा समावेश आहे. उन्हाळ्यात पुदिन्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. पेपरमिंट हा एक स्वस्त, सहज उपलब्ध आणि कोणताही दुष्परिणाम नसलेला नैसर्गिक उपाय आहे.

## तुम्हाला सुद्धा सकाळी.. सकाळी भरपूर पाणी पिण्याची सवय असेल तर सावधान..



आजकाल, दिवसाची सुरुवात कशी करावी यावर अनेक चर्चा होतात. काही लोक तांब्याच्या भांड्यातून भरपूर पाणी पिण्याचा सल्ला देतात, तर काही जण चांदीच्या भांड्यातून भरपूर पाणी पिण्याचा सल्ला देतात.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, दररोज पुरेशा प्रमाणात पाणी पिणे हे निरोगी जीवनशैलीसाठी अत्यावश्यक आहे. शरीरातील सुमारे ६० टक्के भाग पाण्याचा असल्यामुळे त्याची योग्य पातळी राखणे गरजेचे ठरते. नियमितपणे पाणी पिल्याने पचनक्रिया सुधारते, शरीरातील विषारी द्रव्ये बाहेर टाकली जातात आणि मूत्रपिंडाचे कार्य सुरळीत राहते. याशिवाय, त्वचेचा तजेला टिकवून ठेवण्यासाठी आणि शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी पाणी महत्त्वाची भूमिका बजावते. विशेषतः उष्ण हवामानात किंवा शारीरिक श्रम अधिक असताना पाण्याचे प्रमाण वाढवणे आवश्यक असते, अन्यथा शरीरात पाण्याची कमतरता (डिहायड्रेशन) होऊ शकते.

तथापि, तज्ज्ञांनी इशारा दिला आहे की पाणी अतिप्रमाणात पिणे देखील धोकादायक ठरू शकते. शरीरात मीठाचे प्रमाण कमी होऊन 'हायपोनेट्रेमिया' नावाची स्थिती निर्माण होऊ शकते, ज्यामुळे चक्कर येणे, मळमळ आणि अशक्तपणा जाणवू शकतो. त्यामुळे व्यक्तीच्या वय, हवामान आणि शारीरिक हालचाली यानुसार पाणी पिण्याचे प्रमाण ठरवणे आवश्यक आहे. साधारणपणे दिवसाला ७ ते ८ ग्लास पाणी पिणे योग्य मानले जाते, मात्र तहान लागल्यावर पाणी पिणे आणि दिवसभर थोड्या प्रमाणात पाणी घेत राहणे ही सवय अधिक फायदेशीर असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. पण सकाळी उठल्याबरोबर भरपूर पाणी पिणे योग्य आहे का? पाणी पिण्याचे फायदे आहेत, पण सकाळी जास्त पाणी पिण्याची ही पद्धत तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.

सकाळी सकाळी भरपूर प्रमाणात पाणी प्यायल्यामुळे आरोग्यावर कसा परिणाम होतो?

**पचनशक्ती**

रिकाम्या पोटी भरपूर पाणी प्यायल्याने पचनक्रियेवर परिणाम होऊ शकतो. सकाळी पचनशक्ती कमजोर असते आणि भरपूर पाणी प्यायल्याने ती जागृत होण्याऐवजी केवळ मंदावते. त्यामुळे, पचण्याऐवजी, नाश्त्याला खाल्लेले अन्न पोटातच सडू लागते.

**बद्धकोष्ठता**

दुसरे म्हणजे, अपचनामुळे पोटात विषारी पदार्थांची समस्या वाढते. शरीराला पोषक तत्वांची कमतरता भासते आणि बद्धकोष्ठता होऊ लागते.

**जडपणा**

तिसरी सर्वात मोठी समस्या ही आहे की सकाळी जास्त पाणी प्यायल्याने शरीरावर अतिरिक्त ताण येतो. यामुळे पोटात जडपणा येतो आणि भूक लागत नाही. रिकाम्या पोटी जास्त पाणी प्यायल्याने वेदना होतात अशी तक्रारही अनेक लोक करतात.

**सकाळी तहान लागल्यास पाणी कसे प्यावे?**

आता प्रश्न असा आहे की काय करावे. आयुर्वेदानुसार, आपल्या शरीराच्या प्रकृतीनुसार आणि तेही थोड्या प्रमाणात पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. तुम्हाला जितकी तहान लागेल तितके कोमट पाणी प्या. सकाळी लवकर एक लिटर पाणी पिण्याचा प्रयत्न करू नका, कारण त्यामुळे पोटात जडपणा आणि उलट्या होऊ शकतात. जेव्हा तहान लागेल तेव्हाच पाणी प्या. एकाच वेळी दोन लिटर पाणी पिण्याचा प्रयत्न करणे टाळा.

तुमच्या रोजच्या पाणी पिण्याच्या प्रमाणात थोडी वाढ करण्याचा प्रयत्न करा. नेहमी बसून आणि घोट घोट पाणी प्या. उभे राहून पाणी पिणे टाळा, कारण त्याचा पचनक्रियेवर परिणाम होतो. उन्हाळ्यात पाणी पिण्याचे प्रमाण वाढवा, परंतु इतर ऋतूंमध्ये अति प्रमाणात पाणी पिणे टाळा. हिवाळ्यात दिवसभर कोमट पाणी पिऊ शकता, परंतु उन्हाळ्यात खोलीच्या तापमानाचे पाणीच प्यावे.

## नाश्त्यासाठी परफेक्ट! तांदळाच्या पिठाचा बनवा डोसा



रविवार असो किंवा आणखीन कोणता दिवस नाश्त्यासाठी सर्वाधिक दक्षिण भारतीय पदार्थ खाणे पसंत केले जातात. उपमा, इडली, मेदूवडा, डोसा, शिरा, उत्तप्पा हे पदार्थ नाश्त्यासाठी उत्तम तर आहेतच; पण ते पचायलाही हलके असतात. त्यामुळे हे पदार्थ प्रत्येक घरात अगदी आवर्जून बनवले जातात. त्याचप्रमाणे दररोज स्टेशनच्या बाहेर, ऑफिसच्या खाली तर अनेक स्टॉलवरही हे पदार्थ मोठ्या प्रमाणात विकले जातात आणि ग्राहक देखील याला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देतात. तर आज आपण तांदळाच्या पिठाचा डोसा बनवणार आहोत.

साहित्य- तांदळाचं पीठ - २ कप, रवा - २ चमचा, जिरं - १ चमचा, कांदा – कप, गाजर (किसलेलं) - कप, मिरची (चिरलेली) - १ चमचा, कढीपत्ता - ६-७ पाने (चिरलेली), कोथिंबीर - कप (चिरलेली), काळी मिरी पावडर - टीस्पून, मीठ - १ टीस्पून (चवीनुसार), पाणी - ८ कप, तेल

कृती- तांदळाचे पीठ घ्या आणि त्यात रवा, जिरे, कांदा, गाजर, मिरची कडीपत्ता, कोथिंबीर, काळीमिरी पूड, मीठ, पाणी टाकून मिश्रण एकजीव करा आणि बॅटर बनवून घ्या. पॅनमध्ये तेल घ्या आणि गरम तव्यावर बॅटर ओता आणि वरून तेल टाका. अशाप्रकारे तांदळाच्या पिठाचा डोसा तयार.

## भविष्याचे रागरंग




**मेष :** क्रीडा क्षेत्रात असलेल्यांना आज एका मोठ्या स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळेल. तुम्हाला वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाठिंबा मिळू शकतो. मार्केटमध्ये अडकलेले पैसे मिळू शकतात




**वृषभ :** तुमचे कुटुंबीय तुमच्या गुणांची प्रशंसा करू शकतात. नवीन तंत्रज्ञान स्वीकारल्याने तुमच्या व्यवसायाला चालना मिळू शकते आणि उत्पादकता वाढू शकते. से परत मिळू शकतात.




**मिथुन :** तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत रात्रीच्या जेवणाचे नियोजन करू शकता. संगीत किंवा गायन क्षेत्रात असलेल्यांना एका मोठ्या ठिकाणी सादरीकरण करण्याची संधी मिळू शकते.




**कर्क :** नोकरी करणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या कामात यश मिळेल. व्यावसायिकांना उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कामाच्या ठिकाणी तुम्हाला सर्वांचे सहकार्य मिळेल.




**सिंह :** आज तुम्ही समाजकार्यात सहभागी होऊ शकता. एका नवीन संपर्कामुळे तुम्हाला मोठा फायदा होईल. तुमच्या औदार्याने तुमचे विरोधकसुद्धा प्रभावित होतील.





**कन्या :** आज नवीन लोकांशी वागताना सावधगिरी बाळगली पाहिजे. कोणतेही काम सुरू करण्यापूर्वी वडीलधाऱ्यांचा सल्ला घेणे उत्तम. अभ्यासावरील तुमचे लक्ष थोडे कमी होऊ शकते.




**तुळ :** तुम्ही तुमच्या आवडीनुसार विषय निवडण्याचा आणि तुमच्या अभ्यासक्रमात बदल करण्याचा विचार कराल. तुम्ही एखाद्या नवीन प्रकल्पाकडे आकर्षित होऊ शकता.




**वृश्चिक :** करिअरच्या काही आशादायक संधी मिळण्याची शक्यता आहे. एखाद्या विषयावर कुटुंबातील सदस्यांशी किरकोळ मतभेद होऊ शकतात.





**धनु :** तुम्ही एखाद्या नवीन व्यावसायिक समूहात सामील होण्याचा विचार करू शकता. तथापि, व्यवहार करताना तुम्ही सावधगिरी बाळगली पाहिजे. तुम्हाला तुमच्या कार्यक्षेत्रात यश मिळेल.




**मकर :** ऑफिसमधील सहकाऱ्यांशी उत्कृष्ट समन्वय राहील. तुमचे तुमच्या पालकांशी असलेले संबंध अधिक चांगले होतील.




**कुंभ :** एका महत्त्वपूर्ण नोकरीच्या संधीमुळे आर्थिक लाभ होऊ शकतो. तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत मनोरंजनासाठी सहलीचे नियोजन करू शकता.आज आर्थिक व्यवहार टाळा.




**मीन :** तुम्हाला काही नवीन व्यावसायिक प्रस्ताव मिळू शकतात. संगीत क्षेत्रात काम करणाऱ्यांना संमिश्र परिणाम मिळतील. महत्त्वाच्या कामात तुमच्या भावंडांकडून पाठिंबा मिळू शकतो.

## सुनेत्रा पवार यांच्या प्रचाराचा नारळ फुटला ! विकासाची पंढरी असलेल्या बारामतीतून रणशिंग

बारामती: बारामती विधानसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचाराचा नारळ आज भावनिक वातावरणात फोडला. यावेळी मारुतीरायाचे दर्शन घेऊन प्रचाराचा नारळ फोडण्यात आला. यावेळी जय पवार, ऋतुजा पवार, मंत्री अदिती तटकरे, सना मलिक, सरोज अहिरे, ज्योती मेटे, अंकिता पाटील, आमदार सुनील शेळके, सचिन पाटील, वीरधवल जगदाळे, मंत्री संजय बनसोडे यांच्यासह महायुतीचे अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. यावेळी सर्वच नेत्यांनी भाषणात बोलताना अजितदादांची उणीव आणि त्यांच्याबद्दलच्या आठवणी सांगितल्या, त्यावेळी सर्व नेते भावूक झाल्याचे दिसून आले.

अदिती तटकरे पुढे म्हणाल्या की, अजितदादा जेव्हा जेव्हा निवडणुकीला सामोरे जायचे, तेव्हा ते इथे मारुतीरायाचे दर्शन घ्यायचे. २४ फेब्रुवारीला जिल्हा परिषद निवडणुकीची शेवटची सभाही दादांनी याच ठिकाणी घेतली होती. दादांनी या भूमीत केवळ स्वप्न पाहिली नाहीत, तर ती सत्यात उतरवली. त्यांनी आमच्यासारखे अनेक कार्यकर्ते तयार केले. दादा ही केवळ एक व्यक्ती नाही, तर तो एक विचार आहे.

भाषणादरम्यान सुनेत्रा पवार यांच्या भूमिकेचे कौतुक करताना अदिती तटकरे यांचे डोळे पाणावले. दादांनंतर सर्व काही बाजूला ठेवून सुनेत्रा वहिनी खंबीरपणे उभ्या राहिल्या, हे बारामतीकर कधीही विसरणार नाहीत. दादा सहा वेळा उपमुख्यमंत्री झाले, आम्ही त्यांना त्या खुर्चीवर पाहिले आहे. पण आता भविष्यकाळात सुनेत्रा वहिनींनी दादांचे 'मुख्यमंत्री' पदाचे स्वप्न पूर्ण करावे, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. तसेच बारामतीच्या लाडक्या बहिणी सुनेत्रा वहिनींना प्रचंड मताधिक्याने निवडून आणतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी शिवसंग्राम पक्षाच्या नेत्या ज्योती मेटे यांनी सुनेत्रा पवार यांना जाहीर पाठिंबा दिला. शिवसंग्राम पक्ष वहिनींच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. प्रचाराची जी जबाबदारी दिली जाईल, ती आम्ही निष्ठेने पार पाडू, असे त्यांनी सांगितले. यासोबतच अनेक स्थानिक संघटनांनीही सुनेत्रा पवार यांना आपला पाठिंबा जाहीर केला.

मतदारांना आवाहन करताना दत्तात्रय भरणे म्हणाले की, आता मतदान असे करा की तुमचा आवाज केवळ मुंबईत नाही, तर थेट दिल्लीपर्यंत गेला पाहिजे. कार्यकर्त्यांनी छोटे-मोठे मतभेद बाजूला ठेवावेत. कोण पार्थ दादांच्या जवळचे आहे आणि कोण जय दादांच्या, असे विचार मनात आणू नका. आपण सर्वजण पवार कुटुंबाचे देणे लागतो. आपल्या कुटुंबाला लोक विसरले नाहीत, हे मतदानातून सिद्ध करा. मी शेजारचा आहे, पण मला माहिती आहे की एक एक मत महत्त्वाचे आहे. वॉर्डनिहाय मतदान वाढवण्यासाठी प्रयत्न करा. दादांनी महिला आणि शेतकऱ्यांसाठी जे कार्य केले, त्याची पावती म्हणून सुनेत्रा वहिनींना विक्रमी मतांनी विजयी करा, असे आवाहन यावेळी सर्वपक्षीय नेत्यांनी केले.



सुनेत्रा पवार यांच्या प्रचार प्रारंभाच्या सभेत मावळचे आमदार सुनील शेळके यांना आपल्या भावना अनावर झाल्या. ज्या नेत्याने आयुष्याची ३५-४० वर्षे राज्याच्या आणि बारामतीच्या विकासासाठी दिली, त्यांच्या जाण्याने आज पुणे जिल्हा पोरका झाला आहे, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. भाषण करताना सुनील शेळके अत्यंत भावूक झाले होते. ते म्हणाले की, ज्या नेत्याने आपल्याला उभे केले, त्या नेत्याच्या जागेसाठी आज पोटनिवडणूक होत आहे, ही वेळ येणे हे अत्यंत दुर्दैवी आहे. खरं तर ही निवडणूक रद्दच व्हायला हवी होती. ज्यांनी या निवडणुकीत उमेदवार दिले नाहीत, त्यांचे मी आभार मानतो. पण जे ही निवडणूक लढवत आहेत, त्यांना आता कळेल की दादा काय होते आणि 'दादांचा वादा' काय होता! सत्ताधारी असो वा विरोधक, या निवडणुकीच्या निकालातून त्यांना दादांची ताकद समजेल.

सुनेत्रा पवार यांच्या प्रचारसभेत राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सना मलिक यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा देत अत्यंत भावूक भाषण केले. जेव्हा जेव्हा मी भाषणासाठी उभी राहते, तेव्हा दादांची आठवण आल्याशिवाय राहत नाही, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. अजितदादांच्या निधनाचा धक्का किती मोठा होता, हे सांगताना सना मलिक म्हणाल्या, दादांच्या निधनानंतर आम्ही जणू रोबोटसारखे झालो होतो. माझं आणि दादांचं नातं खूप जवळचं होतं. त्यांच्या निधनानंतर मी दोन दिवस स्वतःला खोलीत कोंडून घेतलं होतं. आम्ही आमचा नेता, आमदार आणि उपमुख्यमंत्री गमवला, पण सर्वात मोठं दुःख सुनेत्रा वहिनींचं आहे. त्यांनी त्यांचा जोडीदार गमावला, हे कौटुंबिक दुःख शब्दांच्या पलीकडचे आहे.

सना मलिक यांनी यावेळी जय पवार, पार्थ पवार आणि सुनेत्रा वहिनी यांच्यासोबत आपण खंबीरपणे उभे असल्याचे सांगितले. दादांचे कार्य आणि त्यांचा वारसा पुढे नेण्यासाठी आम्ही पूर्ण ताकदीनिशी वहिनींच्या पाठीशी आहोत, असा विश्वास त्यांनी या सभेत दिला.

## भोजलिंगवाडी अंगणवाडी शाळेत पालक, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या कार्याचा केला गौरव



सांगोला (प्रतिनिधी):- सांगोला तालुक्यातील चोपडी गावांतर्गत भोजलिंगवाडी ( रानमळा) अंगणवाडी शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम हा उल्लेखनीय व गौरवास्पद ठरला आहे. या अंगणवाडी शाळेच्या सेविका मनीषा खळगे व मदतनीस सानिका जावीर यांनी विद्यार्थ्यांवरती उत्कृष्ट प्रकारचे संस्कार करीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमासाठी केलेली तयारी महत्त्वाची ठरली आहे. लहानपणी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षक- शिक्षका यांचा मोलाचा वाटा असतो. विद्यार्थ्यांसाठी लहानपणीच्या संस्काराची शिदोरी जीवनभर उपयुक्त ठरते. वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी सादर केलेले कलाविष्कार कौतुकास्पद आहेत असे मौलिक विचार सेवानिवृत्त सुभेदार अमोल कृष्णा बाबर यांनी भोजलिंगवाडी अंगणवाडी शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलन कार्यक्रम प्रसंगी व्यक्त केले.

शनिवार दिनांक ११ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता भोजलिंगवाडी अंगणवाडी शाळेत आयोजित केलेल्या स्नेहसंमेलन कार्यक्रमप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अमोल बाबर बोलत होते .

कार्यक्रमासाठी व्यासपीठावर पत्रकार दशरथ बाबर तसेच विद्यार्थ्यांचे पालक व युवावर्ग उपस्थित होते. कार्यक्रमासाठी अंगणवाडी सेविका मनीषा खळगे, मदतनीस सानिका जावीर तसेच चोपडी गावातील अलका बाबर, सविता चौगुले, विजया मेखले, पुनम जवंजाळ, शोभा जवंजाळ, ताई जावीर, सविता बाबर, उषा बंडगर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी राहुल बाबर, गणेश चव्हाण, ज्ञानेश्वर बाबर, आगतराव चव्हाण, प्रताप बाबर, अमोल बाबर ,आकाश वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना बक्षीस देत कौतुक केले .

कार्यक्रमप्रसंगी पहिलीसाठी दाखल पात्र मुलांना प्रमुख पाहुणे अमोल बाबर यांच्या हस्ते विद्यारंभ प्रमाणपत्र देण्यात आले. गुढीपाडवा पट वाढवा या उपक्रमांतर्गत हे प्रमाणपत्र देण्यात आले. तीन वर्षाच्या मुलांचा स्वागतोत्सव कार्यक्रम करण्यात आला. यावेळी शाळेतील दोन विद्यार्थ्यांचे वाढदिवसही केक कापून साजरे करण्यात आले. पालकांकडून विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमांतर्गत लावणी, शालेयगीत, भावनिकगीत, लोकनृत्य, सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उलका निकम मॅडम यांनी केले. आकाश वाघमारे यांनी या कार्यक्रमासाठी मोफत साऊंड सिस्टिम सुविधा दिली. कार्यक्रमप्रसंगी उपस्थितांचे आभार भोजलिंगवाडी अंगणवाडी सेविका मनीषा खळगे यांनी मानले.

डॉ.बोराडे हॉस्पिटल
२४ तास अत्यावश्यक सेवा
मोबा: ९६३७२१८०९०
कडलास रोड, सांगोला.
ह्रदयविकार, रक्तदाब, मधुमेह, विषबाधा, पॅरेलेसिस फिट्स,
लिव्हर, किडनीचे आजार या व अशा आजारावर निदान व उपचार
डॉ. प्रमोद धर्मराज बोराडे. MBBS D.N.B (मेडिसीन)
डॉ. सौ. प्राजक्ता प्रमोद बोराडे B.A.MS DRCH (स्त्री रोग तज्ञ)
आपल्या हक्काचं हॉस्पिटल डॉ.बोराडे हॉस्पिटल

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जगाने विश्वरत्न उपाधी दिली- भाई चंद्रकांत सरतापे



महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १४ एप्रिल रोजी १३५ वी जयंती संपूर्ण भारतासह जगात सुध्दा मोठ्या थाटामाटात साजरी होत आहे..विशेषता अमेरीकेच्या गव्हर्नरने सुध्दा १४ एप्रिल हा आंबेडकर समता दिन म्हणुन साजरा करायचे ठरवले आहे.

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेची निर्मीती केली.भारत देशाचा पाया रचताना बाबासाहेबांनी समता,स्वतंत्रता आणि बंधुत्व या मुल्यावर आधारीत भारतीय संवीधानाची निर्मीती केली आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक सुधारणेचा व समतेचा लढा मोठ्या धाडसाने लढला.जातीव्यवस्थेला मुठ माती देत अस्पृश्य व विषमतेच्या विरोधात संघर्ष करुन शोषीतांना संन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थशास्त्र व शिक्षणात क्रांती घडवली.भारतीय रिझर्व्ह बँकेची संकल्पनेच्या माध्यमातून भारतात बँकीग सुरवात झाली.तसेच आंबेडकरांनी महीला समान हक्क व मजुर कायदे निर्माण केल्याने या कामाची दखल जागतीक पातळीवर घेतली गेली.

डॉ बाबासाहेब आंबेडकर हे ज्ञानरत्न होते .बाबासाहेबांचे अफाट वाचन व गाढा अभ्यास यामुळे जगातील अती विद्वानामद्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले जाते.मानवी समतेसाठी व मानवाच्या प्रतिष्ठेसाठी त्यानी आयुष्यभर लढा दिला.

भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्तम मानले जाते.भारतीय संविधानामध्ये समता,स्वतंत्र व बंधुता ही महत्वाची मुल्ये आहेत.भारतीय नागरीकांना समतेच्या मुंल्यामुळे सर्वांना समान दर्जा व समान संधी प्राप्त झाली आहे कोणताही भारतीय नागरीक आसला तरी त्याला कोणताही क्षेत्रामध्ये समान संधी या मुळे निर्माण झाली आहे.कायद्यापुढे सगळे समान आहेत.वंश,जात,लिंग किंवा जन्मस्थान यामुळे कोणत्याही नागरीकांशी भेदभाव करता येणार नाही.आशा अनेक गोष्टी आहेत तेथे भेदभाव करता येत नाही समानता आहे.समानते मुळेच प्रत्येक भारतीयांना मग तो गरीब असो की श्रीमंत प्रत्येकांना एकाच मताचा अधिकार आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातुन भारतीय नागरीकांला प्रत्येक गोष्टीमध्ये स्वतंत्र आहे.मग ते अभिव्यक्ती स्वातंत्र्य असो,भारत भर नोकरी ,व्यवसाय करण्याचे स्वतंत्र असो किंवा आपले स्वताचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असो त्यामुळे प्रत्येक नागरीकाला स्वतंत्र पणे समाजात गावात राज्यात देशात रहाता येते..

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानामध्ये बंधुता हे महत्वाचे मुल्य आहे.सर्व भारतीयांमध्ये भातृभाव,एकात्मता आणी आपुलकीची भावना निर्माण करण्यासाठी हे मुल्य महत्वाचे आहे.आपण सारे भारतीय बंधु भावाने राहायचे बंधु भाव मध्ये सर्व धर्म जात पंथ आसे सारेच बंधुभावाने राहणे त्यामुळे देशाप्रती मान सन्मान,आपुलकी निर्माण होते त्यामुळे सर्वांमध्ये देशप्रेमाची भावना वाढीस लागते..

जगाच्या पाठीवर भारतीय संविधान यासाठीच जगात श्रेष्ठ मानले जाते. भारतीय संविधानाची दखल जगात घेतली जाते.म्हणुन तर भारतीयांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विश्वरत्न पदवी बहाल केली आहे..

## सुखदेव प्रभू शेंडे यांचे निधन



महूद: महिम (ता.सांगोला) येथील सुखदेव प्रभू शेंडे (वय ७५) यांचे शनिवार(ता.११) रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. सुखदेव शेंडे यांनी सदाशिवनगर येथील साखर कारखान्यामध्ये अकाउंटंट म्हणून तब्बल ३५ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावली.आपल्या कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा व साध्या स्वभावामुळे ते सर्वांच्या आदरास पात्र ठरले होते.त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुली,दोन मुले,जावई, सून व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या सर्व मुली व जावई तसेच दोन्ही मुले व सून हे शासकीय सेवेत कार्यरत आहेत. नातवंडे वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षण घेत असून कुटुंबाने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

जागा तुमची आणि संपुर्ण मटेरियल व मजुरी सहित उत्कृष्ट, दर्जेदार, आणि मजबूत पद्धतीचे काम आमचे कामाचे 2D,3D प्लान, स्टील डिजाइन, संपुर्ण RCC काम व संपुर्ण विट बांधकाम व प्लास्टर काम आणि संपूर्ण फरशी काम ,किचन कट्टा, वॉल टाइल्स, संपुर्ण लाईट फिटिंग कंसील किंवा ओपन , संपूर्ण पाईप प्लंबर फिटिंग कंसील किंवा ओपन . संपुर्ण फेब्रिकेशन लोखंडी काम व संपुर्ण स्टील फेब्रिकेशन काम, संपुर्ण अल्युमिनियम खिडकीचे काम.व संपूर्ण दरवाजाचे व खिडक्यांची कामे, आणि संपुर्ण कामाला इमारतीला फक्त पांढरा कलर दिला जाईल . अशा प्रकारे संपूर्ण काम वास्तुशास्त्र पद्धतीने योग्य आणि सध्या चालू असलेल्या दरात केले जाते . फक्त सांगोला , आटपाडी , कवठेमहांकाळ , जत.तालुक्यात
भाऊ कन्स्ट्रक्शन बिल्डर्स अँड डेव्हलपर्स

संपर्क
भाऊ कन्स्ट्रक्शन बिल्डर्स अँड डेव्हलपर्स
मु.पो.गौडवाडी,ता.सांगोला,जि. सोलापूर.
श्री. प्रदिप शामराव कांबळे. उर्फ भाऊ | Mob:9004792356

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत मोठा बदल; रुग्णांना अवघ्या ८ तासांत कळवला जाणार मदतीचा निर्णय




मुंबई:- मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत मोठा बदल करण्यात आला आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीची सर्व कागदपत्रे आणि निर्णय घेण्याची प्रक्रिया आता पूर्णपणे ऑनलाइन होणार आहे. यामुळे रुग्णांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना मंत्रालयातील चकरा मारण्याची गरज उरणार नाही. यापूर्वी रुग्णांना स्वतः अर्ज करावा लागायचा. आता संबंधित रुग्णालयांनाच रुग्णाची कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करावी लागतील. यासाठी प्रत्येक रुग्णालयाला स्वतंत्र 'लॉगिन' आणि 'पासवर्ड' दिला जाईल, अशी माहिती समोर आली आहे.

दरम्यान, अर्ज अपलोड केल्यानंतर ३ ते ८ कार्यालयीन तासांच्या आत मदतीचा निर्णय रुग्णालय आणि नातेवाईकांना कळवला जाईल. कागदपत्रे उशिरा अपलोड झाल्यास दुसऱ्या दिवशी कार्यालयीन वेळेत निर्णय दिला जाईल. तसेच मंजूर झालेली पूर्ण रक्कम एकाच वेळी न देता, सुरुवातीला ३०% रक्कम आणि उर्वरित रक्कम रुग्णाला डिस्चार्ज मिळताना दिली जाईल, अशी देखील माहिती आहे.

अशातच, २०२५ मध्ये या निधीतून ४०,७७६ रुग्णांना सुमारे ३३३.६ कोटी रुपयांची मदत करण्यात आलीय. आता कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी च्या माध्यमातून ही मदत आणखी वाढवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. तर कॅन्सरग्रस्त मुलांच्या उपचारांसाठी टाटा मेमोरियल हॉस्पिटल आणि 'भारत पेट्रोलियम' सोबत त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे. यामुळे अशा मुलांना मोफत उपचार मिळण्यास मदत होईल. या नवीन डिजिटल प्रणालीचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुढील आठवड्याच्या सुरुवातीला होण्याची शक्यता आहे.सर्वसामान्य रुग्णांसाठी जीवनदायिनी ठरलेल्या मुख्यमंत्री सहायता निधीच्या अर्ज प्रक्रियेसाठी नवीन ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले असून, दि. ७ एप्रिल २०२६ पासून जुनी पद्धत पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. यापुढे सर्व अर्ज फक्त ऑनलाईन माध्यमातूनच स्वीकारले जाणार आहेत.

रुग्णालयांनी आपला अधिकृत ई-मेल आयडी नोंदवून युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करणे तसेच ए-घधउ प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे. रुग्णांना वेळेवर मदत मिळण्यासाठी संबंधितांनी ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, जेणेकरून कोणताही अडथळा निर्माण होणार नाही. सर्वसामान्य नागरिकांना तत्काळ आणि सुलभ पद्धतीने मदत मिळावी यांकरिता घेतलेल्या या अत्यंत महत्त्वपूर्ण आणि लोकाभिमुख निर्णयासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार, अशी प्रतिक्रिया महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

## आता चेंडू अमेरिकेच्या कोर्टात!

इस्लामाबाद:- इस्लामाबादमधील चर्चा फिस्टकल्यानंतर इराण संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी आपली पहिले अधिकृत निवेदन जारी केलं आहे.

त्यांनी म्हटले आहे की, वाटाघाटींच्या या फेरीत दुसरी बाजू (अमेरिका) इराणी प्रतिनिधींचा विश्वास संपादन करण्यात अपयशी ठरली. गालिबाफ यांनी सांगितले की, चर्चा सुरू होण्यापूर्वीच त्यांनी हे स्पष्ट केले होते की, इराणचा सहभागी होण्याचा हेतू आणि इच्छा दोन्ही आहेत, परंतु मागील दोन युद्धांच्या अनुभवांमुळे दुसऱ्या बाजूवर अविश्वास निर्माण झाला आहे. या चर्चा शक्य केल्याबद्दल गालिबाफ यांनी पाकिस्तानचे आभार मानले.

गालिबाफ यांनी ट्विट करत म्हटलं आहे की, वाटाघाटी सुरू होण्यापूर्वी मी स्पष्ट केले होते की, आमच्याकडे आवश्यक सदिच्छा आणि इच्छाशक्ती आहे. परंतु, गेल्या दोन युद्धांच्या अनुभवामुळे आमचा समोरच्या पक्षावर (अमेरिका) कोणताही विश्वास नाही. माझ्या सहकाऱ्यांनी आणि 'मिनाब १६८' या ईराणी शिष्टमंडळाने भविष्याचा वेध घेणारे अनेक प्रस्ताव मांडले, परंतु समोरचा पक्ष या चर्चेच्या फेरीत ईराणी शिष्टमंडळाचा विश्वास संपादन करण्यात अपयशी ठरला.

गाळा भाड्याने देणे आहे.
एम.बी.एम.मॉल मधील
४ गाळे भाड्याने देणे आहेत.
तसेच दत्तनगर मधील सर्वसोयीनियुक्त
३ बीएचके बंगला भाड्याने देणे आहे.
संपर्क: 9422370408

## न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन



सांगोला (प्रतिनिधी):- न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त संस्था सदस्य प्रा.डॉ. अशोकराव शिंदे, प्रा दीपक खटकाळे, प्रा जयंत जानकर, प्राचार्य प्रा केशव माने, उपप्राचार्य प्रा संतोष जाधव, उपमुख्याध्यापिका सौ वैशाली घोडके मॅडम, पर्यवेक्षक श्री दशरथ जाधव सर, पर्यवेक्षक श्री तात्यासो इमडे सर, पर्यवेक्षक श्री माणिकराव देशमुख सर यांच्या शुभहस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

मराठी विभागाचे प्रा.अरुण बेहेरे यांनी आपल्या मनोगतामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याविषयी उपस्थित विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.सौ. इंदिरा येडगे यांनी तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा.संतोष राजगुरू यांनी मानले. याप्रसंगी न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मधील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर सांगोला शहरात पोलिसांचे पथसंचलन



सांगोला(प्रतिनिधी):- कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने तसेच आगामी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव शांततेत व सुरक्षित वातावरणात पार पडावा,यासाठी सांगोला शहर व तालुक्यामध्ये पोलिस प्रशासनाच्या वतीने पथसंचलन (रूटमार्च) आयोजित करण्यात आले होते.

सदर पथसंचलनाची सुरुवात सांगोला पोलीस ठाणे येथून करण्यात आली. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, भीम नगर, वाढेगाव नाका, महादेव गल्ली, शनी गल्ली, परीट गल्ली, हनुमान मंदिर, जय भवानी चौक, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, तहसील कार्यालय मार्गे पुन्हा पोलीस ठाणे येथे पथसंचलनाचा समारोप करण्यात आला. या मार्गावरून पोलिसांनी पायी संचलन करत नागरिकांना शांतता व कायदा सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले.

या पथसंचलनामध्ये पोलीस निरीक्षक श्री. विनोद घुगे, पोलीस उपनिरीक्षक पाटील, पुजारी, काशीद, महिला पोलीस अधिकारी उबाळे मॅडम तसेच पोलीस अमलदार व होमगार्ड मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

गुडलक टेलर
माने कॉम्पलेक्स, न्यू इंग्लिश स्कूल समोर, वासूद रोड, सांगोला
* विविध नामवंत कंपनीच्या कापडासह कपडे शिवून मिळतील.

प्रोप्रा.भगवान पांडुरंग खटके
मो.९७६५२२३१८७

१ बी.एच.के.२ फ्लॅट भाड्याने देणे आहे.
सांगोला शहरातील उत्कर्ष प्राथमिक विद्यालयाजवळ असलेले सर्व सोयीनींयुक्त १ बी.एच.के.२ फ्लॅट भाड्याने देणे आहे.
संपर्क :- मो.९७६७५६९५९५

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा म्हणून कमलापूर व महिम येथील शाळेची निवड

**कमलापूर जिल्हा परिषदेची शाळा ही भविष्यात स्पर्धा परीक्षांचे केंद्र निर्माण करण्याचा आमचा मानस आहे. भविष्यवेधी शिक्षणावर भर देऊन स्पर्धा परीक्षांच्या सराव करण्यावर भर दिला जात आहे. जिल्हा परिषदेची शाळा असूनही रात्र अभ्यासिका, जादा तास, तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन असे अनेक उपक्रम या शाळेत राबवले जात आहेत. गोरगरिबांच्या मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत असे मुख्याध्यापक बशीर मुलाणी व शिक्षक सुनील आदलिंगे यांनी सांगितले.**

सांगोला (प्रतिनिधी): ग्रामीण शिक्षणाला नवी उंची देणाऱ्या राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी निर्णयामुळे सांगोला तालुक्याच्या शैक्षणिक नकाशावर अभिमानाची नोंद झाली आहे. तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कमलापूर आणि जिल्हा परिषद शाळा महिम या दोन शाळांची 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' म्हणून निवड करण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागाच्या या निर्णयामुळे सांगोल्याच्या शिक्षण क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे.

राज्यातील शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने राज्यातील ४०५ शासकीय शाळांना आता 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' म्हणून विकसित करण्यास मान्यता दिली आहे. सांगोला तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कमलापूर आणि जिल्हा परिषद शाळा महिम या दोन शाळांची निवड करण्यात आली आहे.

राज्यातील शालेय शिक्षण अधिक दर्जेदार, सक्षम आणि सर्वसमावेशक करण्याच्या उद्देशाने ४०५ शासकीय शाळांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये सांगोल्याचा समावेश झाल्याने सांगोला तालुक्याचा नावलौकिक वाढला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि सर्वसमावेशक शिक्षण उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या शाळांमध्ये समूह साधन केंद्र, पीएम श्री आणि विद्यानिकेतन शाळांचा समावेश करण्यात येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांनी आतापर्यंत सर्वसामान्य व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले आहे. आता 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' उपक्रमामुळे या शाळांचा दर्जा उंचावून त्यांना खाजगी शाळांशी स्पर्धात्मक बनवण्याचा सरकारचा मानस आहे.

या योजनेअंतर्गत आधुनिक आणि सुसज्ज वर्गखोल्या अखंड, गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रणाली, मुला-मुलींसाठी स्वतंत्र व स्वच्छ स्वच्छतागृहे, आरओद्वारे शुद्ध पिण्याचे पाणी विद्यार्थिनींसाठी 'पिंक रूम'ची विशेष व्यवस्था, क्रीडा प्रबोधिनीच्या सुविधा, गुणवत्ता आणि सुरक्षिततेवर भर देण्यात येणार आहे.

सांगोला तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कमलापूर आणि जिल्हा परिषद शाळा महिम, माढा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कव्हे, जिल्हा परिषद शाळा मोडनिंब नंबर एक, सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद हायस्कूल माढा, पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा फुलचिंचोली, दक्षिण सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा उळे, जिल्हा परिषद शाळा वळसंग (मराठी), जिल्हा परिषद शाळा भंडारकवठे, जिल्हा परिषद शाळा कुसुर, मंगळवेढा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा आंधळगाव आणि जिल्हा परिषद शाळा भोसे, मोहोळ तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कोन्हेरी या १२ शाळांची 'भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा' म्हणून निवड करण्यात आली आहे.

कमलापूर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक बशीर मुलाणी आणि शिक्षक सुनील आदलिंगे यांनी सांगितले, आमचा उद्देश विद्यार्थ्यांना भविष्याभिमुख शिक्षण देण्याचा आहे. रात्र अभ्यासिका, जादा तास आणि तज्ज्ञ मार्गदर्शनाच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम पायाभरणी केली जात आहे. गोरगरिबांच्या मुलांनाही उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

# शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज मधील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न



सांगोला:- येथील रामकृष्ण टेक्निकल एज्युकेशन सोसायटी संचलित शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष श्री.महादेव गायकवाड हे होते. यावेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. रणजीत देशमुख, सर्व विभागाचे विभाग प्रमुख हे ही उपस्थित होते.

प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचे हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत प्राचार्य डॉ.रणजीत देशमुख यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासावर प्रकाश टाकला आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्राचार्यांनी सांगितले की, आज तुम्ही संस्थेचे महत्त्वपूर्ण भाग म्हणून येथून पुढे जात आहात. तुमच्यातील ज्ञान आणि कौशल्याच्या जोरावर तुम्ही निश्चितच यशस्वी व्हाल. तुम्ही आज इथून पुढच्या आयुष्याच्या प्रवासाला सुरुवात करत आहात. या कॉलेजमध्ये घेतलेले शिक्षण, मिळवलेले ज्ञान, आणि अनुभव हे तुमच्या पुढील आयुष्यात नक्कीच मार्गदर्शक ठरतील. येथे शिकलेली शिस्त, परिश्रम आणि प्रामाणिकपणा हीच तुमची खरी ओळख असेल.

यानंतर तृतीय वर्षाच्या वैष्णवी भोसले, समीक्षा लिगाडे, शितल सावंत, सानिका गरंडे सानिका साळुंखे, शुभम स्वामी, नम्रता खटकाळे, साक्षी गायकवाड, पूजा गायकवाड या विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी संस्थेत घालवलेल्या वर्षांतील अनुभव सांगितले आणि प्राध्यापकांनी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या मित्र-मैत्रिणींसोबतच्या आठवणी सांगताना भावुक झाले.

यानंतर प्रथम वर्ष विभागाचे विभाग प्रमुख प्रा.पी.जी.पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना असा संदेश दिला की, यश मिळवण्यासाठी केवळ बुद्धिमत्ता पुरेशी नसते, तर सातत्य, मेहनत आणि सकारात्मक दृष्टिकोनही तितकाच महत्त्वाचा असतो. आयुष्यात अडचणी येतील, अपयशही येईल, पण त्या प्रत्येक प्रसंगातून काहीतरी शिकून पुढे जाणे हेच खरे यश आहे.

यावेळी कॉलेजची माजी विद्यार्थिनी संजना हणमंत येलपले यांची पिंपरी चिंचवड येथे महाराष्ट्र पोलीस पदी निवड झाल्याबद्दल कॉलेजच्या वतीने सत्कार करण्यात आला. यासोबत सिव्हिल विभागातील शुभम टाकळे याने स्वेरी कॉलेज येथे कॅड वॉर या इव्हेंट मध्ये प्रथम क्रमांक मिळवला, तसेच नम्रता खटकाळे, पूजा गायकवाड व समृद्धी काळुंखे या विद्यार्थ्यांनी सिद्धार्थ पॉलिटेक्निक जत, येथे ब्रिज मेकिंग या इव्हेंट मध्ये प्रथम क्रमांक मिळवला आणि श्रेयश भगत याने कर्मयोगी इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी शेळवे, येथे कॅड वॉर या इव्हेंट मध्ये उपविजेते पद प्राप्त केले. या सर्व विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. महादेव गायकवाड यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील जीवनासाठी मार्गदर्शन केले आणि संस्थेशी असलेले नाते कायम ठेवण्याचे आवाहन केले. याचबरोबर आई-वडिलांची कधी फसवणूक करू नका. कष्ट करा, मेहनत करा कारण कष्टाला फळ जरूर मिळते, असे प्रतिपादन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, तुमच्या शिक्षण प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. भविष्यात तुम्ही यशस्वी व्हा, ह्याच आमच्या शुभेच्छा. पुढे बोलताना ते म्हणाले की, सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्न करत रहा. आयुष्यात चांगले वळण हे फक्त शिक्षणामुळे मिळते. शेवटी पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. संदीप बावचे यांनी केले.

# फॅबटेकच्या विद्यार्थ्यांची सांगोला नगरपालिका कार्यालयाच्या इमारतीस भेट



सांगोला :- फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला महाविद्यालयातील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील द्वितीय व तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या ८० हून अधिक विद्यार्थ्यांची नुकतीच सांगोला येथील नगरपालिकेच्या ऐतिहासिक बांधकाम करण्यात आलेल्या कार्यालयाला भेट देऊन बांधकामाची माहिती घेतली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे यांनी दिली.

सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या भेटीत नगरपालिका नवीन इमारत बांधकाम, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स आणि पार्किंग सुविधा याशिवाय सांडपाणी प्रक्रियाकरक यंत्र, पंपिंग स्टेशन बांधकाम आदींची माहिती नगरपालिकेतील पदाधिकाऱ्यांनी माहिती दिली. वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेऊन सांगोल्यात होत असलेल्या नगरपालिकेच्या एतिहासिक इमारतीची पाहणी करून विद्यार्थ्यांना बांधकाम क्षेत्रातील ज्ञान आत्मसात करण्याची संधी यातून मिळाली.

हि भेट प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे, उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर, विभागप्रमुख प्रा. विशाल भाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. हि भेट यशस्वी करण्यासाठी सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# महात्मा फुले यांचे कार्य म्हणजे सामाजिक समतेचा लढा- भाऊसाहेब रूपनर

## फॅबटेक मध्ये महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त अभिवादन



सांगोला (प्रतिनिधी):- महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य म्हणजे सामाजिक समतेसाठीचा एक मोठा लढा होय. त्यांनी जातीभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य आणि अंधश्रद्धेविरुद्ध संघर्ष करून शिक्षण आणि समतेच्या आधारे बहुजन समाजाला आत्मसन्मान मिळवून दिला. शोषित, पीडित वर्गाच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष केला. क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी समाजासाठी केलेले कार्य, स्त्री शिक्षणासाठी, त्यांच्या सक्षमीकरणासाठी दिलेला लढा महान आहे. ज्याकाळात स्त्रीयांनी शिक्षण घ्यावे ही कल्पनाच समाजाला मान्य नव्हती त्या काळात महात्मा फुलेंनी स्त्रीयांना शिकवण्याचा मनामध्ये निर्धार करून आपल्या कार्याला सुरुवात केली. स्त्रीशिक्षणाचे कार्य करत असताना त्यांना अनेक अडचणी व रोज नवनव्या संकटांना सामोरे जावे लागले तरी ते मागे हटले नाहीत म्हणून आज प्रत्येक क्षेत्रात स्त्री काम करत असून महात्मा फुले यांचे कार्य म्हणजे सामाजिक समतेसाठीचा लढा असल्याचे मत फॅबटेक संस्थेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर यांनी व्यक्त केले.

फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला महाविद्यालयात शनिवार दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, इंजिनिअरिंग चे प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे, उपप्राचार्या डाँ. विद्याराणी क्षीरसागर, पॉलिटेक्निकचे प्राचार्य तानाजी बुरूंगले आदींच्या हस्ते करण्यात आले.या दरम्यान प्रा. स्वप्नील बंडगर, प्रा. शरद आदलिंगे, प्रा. अमोल पोरे यांनी महात्मा फुले यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकत मनोगत व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. अमोल पोरे यांनी केले.

# स्वेरी मध्ये 'पॉवर प्रवाह २०२६' हा तांत्रिक उपक्रम उत्साहात संपन्न

पंढरपूर- गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)च्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने 'पॉवर प्रवाह २०२६' या राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.चित्रसेन मैतई यांच्या नेतृत्वाखाली या तांत्रिक उपक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या उदघाटन समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पंढरपूर महावितरणचे कार्यकारी अभियंता संजय चंद्रकांत शिंदे व गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर कल्पक देशमुख हे लाभले.

या उपक्रमांतर्गत झालेल्या स्पर्धांच्या पारितोषक वितरणासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आयईआय सोलापूर लोकल चॅप्टरचे सचिव ओमप्रकाश दरक, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार उपस्थित होते.

यावेळी स्वेरीचे माजी विद्यार्थी व उद्योजक असलेले श्रेयस पावर सोल्युशनचे संस्थापक श्रेयस कुलकर्णी, स्वेरीच्या परीक्षा विभागाचे प्रमुख डॉ.एस. ए. लेंडवे, इन्फ्रास्ट्रक्चर अधिष्ठाता डॉ.डी.ए. तंबोळी, प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा. ए.ए. मोटे, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. सागर चौगुले यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन सानिका बागल व समीक्षा गटकळ यांनी केले तर विभागप्रमुख डॉ.चित्रसेन मैतई यांनी आभार मानले.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन



पंढरपूर, दि १२:- राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्याकडून उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांचा शाल व श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, आमदार तानाजी सावंत, मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम, लेखाधिकारी मुकेश अनेचा यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

✻ आमदार शशिकांत शिंदे हे मूळचे शिवसैनिक आहेत. ते शिवसेनेत आले तर त्यांचे स्वागत करेन असं वक्तव्य शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेश शिंदे यांनी केलं होतं. त्यांनी केलेल्या या टीकेला शशिकांत शिंदे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. माझा पिंड लढण्याचा आहे. मी जिथे असतो तिथं प्रामाणिक असतो, यांच्यासारखा पाच पक्ष बदलत नाही अशी टीका शशिकांत शिंदे यांनी केली. ते माझे शिवसेनेत स्वागत करत आहेत, पण यापुढे ते शिवसेनेत आहेत का? याचा त्यांनी शोध घ्यावा. कारण शिवसेनेत त्यांची विश्वासाहर्ता राहिलेली नाही असा टोलाही लगावला.

**भावपूर्ण श्रद्धांजली.**



विजयलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेचे तज्ञ संचालक **भारत नारायण राऊत** यांचे दि ११ एप्रिल २०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.त्यांच्या निधनाने राऊत कुटुंबीयावर जो दुःखाचा डोंगर कोसळला आहे त्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच प्रार्थना.!

शोकाकुल
**विजयलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सांगोला**
चेअरमन, व्हा.चेअरमन ,संचालक मंडळ , कर्मचारी वर्ग व बचत एजंट

**जागा विकणे आहे.**
सांगोला -चिंचोली रोड लगत रोड टच ६६ फूट फ्रंट असलेली २० गुंठे जागा योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
संपर्क : 9869028742

**पाहिजेत**
कापड दुकानात काम करण्यासाठी पुरुष व मुले कामगार पाहिजेत.
✻ अनुभवी लोकांना प्राधान्य.
✻ आकर्षक पगार दिला जाईल.
9923324253

TATA POWER SOLAROOF
भारताची क्र. १ ची सोलर रूफटॉप कंपनी*
अधिकृत चॅनल पार्टनर: सनर्जी सोलर
संपर्क : 9022908009 / 9075929191 8009300996. मार्केट यार्ड समोर, पंढरपूर रोड, सांगोला
हे ऑन तर क्वालिटी लाइफलाँग

**स्कीन क्लिनिक**
डॉ.करमुडे यु.एम. एम.बी.बी.एस.एम.डी.पुणे (त्वचारोग तज्ञ)
मो.७०८३३३४४३४, ९९७५७०७७२७
सेवानिवृत्त प्रमुख डॉक्टर, त्वचारोग विभाग, ससून हॉस्पिटल, पुणे
ठिकाण:- सांगोला, म.फुले चौक (पुतळ्याजवळ), महात्मा फुले संकुल, तळमजला, बी-१ (नवीन इमारत)



डॉ.करमुडे यु.एम.
वेळ-दररोज दुपारी १२ ते सांय.५ (शनिवारी बंद)